# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 21.10.2025** **वार- मंगळवार**

---

**दीपावली**

दीपावलीच्या मंगल पर्वामुळे सर्वत्र चैतन्यमय वातावरण असून आज अश्विन अमावास्येला घरोघरी तसंच व्यापारी पेठांमध्ये लक्ष्मीपूजनाचा उत्साह दिसून येत आहे. रंगीबेरंगी आकाशकंदील, पणत्या आणि आकर्षक विद्युत रोषणाईनं पुण्याचा परिसर उजळून निघाला आहे. मनमोहक रांगोळ्या लक्ष वेधून घेत आहेत, पारंपरिक पद्धतीनं लक्ष्मीपूजन करण्यासाठी घरोघरी लगबग सुरू आहे.

**संगीतकार्यक्रम**

दिवाळीच्या निमित्ताने पुण्याच्या विविध भागात पहाट मैफिलींचं आयोजन करण्यात येत आहे. कोथरूडमधील माजी नगरसेविका हर्षाली माथवड यांच्या पुढाकाराने झालेल्या कोथरूड सुरोत्सवात राहुल देशपांडे यांच्यासह अन्य मान्यवर गायकांनी आपल्या गायकीने श्रोत्यांना मंत्रमुग्ध केलं.

**आजीआजोबा**

महाराष्ट्र नवनिर्माण सेना पुणे शहर आणि प्रल्हाद गवळी मित्र परिवाराच्या वतीने निराधार आणि ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते दीपावलीचा  दिवा लावून दिवाळी साजरी करण्यात आली. यावेळी निराधार आजी-आजोबांना दिवाळीचा फराळ, नवा पोशाख, देऊन त्यांनाही दीपोत्सवाचा आनंद देण्यात आला.

**स्वच्छता**

स्वराज्याचे शिलेदार प्रतिष्ठानच्या वतीने पानशेत इथल्या वीर बाजी पासलकर स्मारकाची स्वच्छता करून काल दीपोत्सव साजरा करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांना पहिला दिवा अर्पण करण्यात आला. शिवभक्तांनी शंखनाथ करून दीपोत्सवाला सुरुवात केली. यावेळी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**आर्थिकमदत**

यंदाच्या पावसाळ्यात अतिवृष्टी आणि पुरामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना आता ३ हेक्टरपर्यंतच्या बाधित क्षेत्रासाठी मदत मिळणार आहे. यासाठी विशेष बाब म्हणून ६४८ कोटी १५ लाख ४१ हजार रुपयांच्या निधी वितरणाला मान्यता देण्यात आली आहे. मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी ही माहिती दिली. याबाबतचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. यंदाच्या खरीप हंगामात शेतकऱ्यांना सुमारे ८ हजार १३९ कोटी रुपयांचं अर्थसहाय्य वितरित करण्याबाबत शासन निर्णय जारी झाले आहेत.

**कचरा**

पुण्यातील विमाननगर आणि भवानी पेठ परिसरात घरोघरी तयार होणारा कचरा इमारतींच्या खाली तसंच सोसायट्यांच्या प्रवेशद्वाराजवळ गोळा करण्याचा प्रयोग पुणे महापालिकेने केले होता; हा प्रयोग इतर भागांतही करण्याचा महापालिकेचा विचार आहे. महापालिकेचे घनकचरा विभागाचे प्रमुख आणि उपायुक्त संदीप कदम यांनी ही माहिती दिली. जे नागरिक कचरा गोळा करण्याचे शुल्क देत नाहीत, त्यांचा कचरा गोळा केला जात नव्हता. परिणामी, अनेक नागरिकांकडून रात्री किंवा पहाटे रस्त्यांच्या कडेला सर्रास कचरा टाकण्याचे प्रकार होत असत. या पार्श्वभूमीवर पुणे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्या नेतृत्वाखाली घरोघरी जाऊन कचरा संकलन करणारे सेवक आणि कचरा वाहून नेण्याची व्यवस्था याची सांगड घालून सार्वजनिक ठिकाणी कचरा दिसणार नाही यासाठी हा प्रयोग राबविण्यात आला होता.

**कर संकलन**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर संकलन विभागामार्फत मालमत्ता कर वसुली मोहिमेला गती देण्यात आली आहे. थकबाकीदारांवर जप्तीची कठोर कारवाई सुरू आहे. आतापर्यंत शहरातील २७ मालमत्तांवर जप्तीची कारवाई करण्यात आली आहे. थकबाकीदारांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. महापालिकेकडून वारंवार आवाहन करून, नोटीस देऊन देखील मालमत्ता कर न भरणाऱ्या नागरिकांच्या मालमत्ता जप्त करण्याची ही मोहीम पुढील महिनाभर व्यापक स्वरूपात राबविण्यात येणार आहे, अशी माहिती कर संकलन विभागाचे सहायक आयुक्त अविनाश शिंदे यांनी दिली.

**मुद्रांकशुल्क**

मुद्रांक शुल्काच्या पुणे विभागातील प्रलंबित १ हजार ८७४ प्रकरणे निकाली काढण्यासाठी मुद्रांक शुल्क विभागाने विशेष मोहीम हाती घेतली आहे. येत्या २७ ऑक्टोबर ते दोन नोव्हेंबर या कालावधीत ही मोहीम राबविण्यात येणार आहे.

**लोककल्याणभूषण**

निराश्रितांची सेवा करण्याचा सिंधूताई सपकाळ यांचा वारसा ममताताईंनी त्याच जोमाने पुढे सुरू ठेवला आहे, असे गौरवोद्गार राज्याचे माजी प्रधान सचिव महेश झगडे यांनी काढले. लोककल्याण प्रतिष्ठानच्या वतीने '23वा लोककल्याण भूषण' पुरस्कार झगडे यांच्या हस्ते ममताताई सपकाळ यांना प्रदान करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते.

**आग**

पुण्यातील वाकड भागात एका इलेक्ट्रिक दुचाकीच्या दुकानात लागलेल्या आगीत ३५ ते ४० दुचाकी जाळून खाक झाल्या. आज पहाटे ही घटना घडली. बॅटरीचा स्फोट झाल्याने आग लागली असावी, असा अंदाज आहे. दरम्यान काल दुपारपासून आज पहाटेपर्यंत पुणे आणि परिसरात आगीच्या २५ घटना घडल्या आहेत; त्यातील तीन ठिकाणी फटक्यांमुळे आग लागली आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज दुपारनंतर काहीसं ढगाळ वातावरण होतं, आज कमाल तापमान ३१ तर किमान तापमान २१ पूर्णांक ३ दशांश अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. उद्या कमाल तापमानात किंचित वाढ होण्याची अपेक्षा असून दुपारनंतर हलक्या पावसाचाही अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता,ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.**